परभणी शनिवार, ०४ मार्च २०२३ । पाने ६ । वर्ष ३२ वे । अंक ७० किंमत २.०० रूपये

# महिलांच्या छळाच्या तक्रारीने अस्वस्थ-रूपाली चाकणकर

परभणी, (प्रतिनिधी) - परभणी जिल्हयातील बालविवाहचे प्रमाण व स्त्रियांवरील होणारे अत्याचार थांबवण्यासाठी प्रबोधन आवश्यक आहे. महिलांच्या छळाच्या तक्रारीने अस्वस्थ झाल्याची भावना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पत्रकारांसमक्ष व्यक्त केली.

### चहा तर सोडा पत्रकारांना पाणी मिळाले नाही

महिला आयोगाच्या दिमतीला महसूल व पोलीस प्रशासन असताना त्यातच पत्रकार परिषदेची वेळ होऊन ही अर्धा तास उलटूनही कुणीही त्या ठिकाणी फिरके नासे झाले होते. काही पत्रकारांनी पाण्याची मागणी केली. परंतु प्रशासन पाणी उपलब्ध करून देण्यास असमर्थ ठरल्याचे चित्र होते. काही पत्रकारांनी दबक्या आवाजात याबद्दल नाराजी ही व्यक्त केली. चहा तर सोडाच पाणी देखील न मिळालेले पत्रकार हिरमुसले होते. यामुळे महिला आयोगाच्या यानंतरच्या पत्रकार परिषदेची चांगलीच दखल पत्रकार घेतील यात दुमत नाही.

परभणी जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्षात शुक्रवार दि.३ मार्च रोजी राज्य महिला आयोगाच्या वतीने 'आयोग आपल्या दारी' अभियानांतर्गत तक्रारी स्वीकारून जन सुनावण्या घेण्यात आल्या. यानंतर चाकणकर यांनी पत्रकारांशी वार्तालाप केला. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्या अॅड.संगीता चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी डॉ.प्रताप काळे, पोलीस अधीक्षक रागसुधा आर., निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, बालविकास अधिकारी कैलास तिडके, भावना नखाते आदींची उपस्थिती होती.

चाकणकर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना परभणीतील जनसुनावणीत ९५ पेक्षा अधिक तक्रारी ऐकून घेत त्यांचे निराकरण करण्यात आले. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, गर्भपाताच्या वेळी झालेल्या मृत्यू प्रकरणातील तपासकामात दिरंगाई, महिलांशी असभ्य वर्तन व महिला, मुलींवरील अत्याचाराच्या अनुषंगाने काही तक्रारी दाखल झाल्या आहेत. गर्भपात, अवैध गर्भलिंग निदान चाचणी हे मुद्दे समोर आले आहेत. या सर्व तक्रारी निपटारा १५ दिवसांत करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महिलांच्या तक्रारी सोडवण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवावी, अशा सूचना दिल्या आहेत. प्रसवपूर्व



### स्त्रीवरील अत्याचार थांबवण्यासाठी प्रबोधन आवश्यक

गर्भलिंग निदान चाचणी प्रकरणात उद्यापासूनच तपासणी मोहीम हाती घ्या. प्रत्येक सोनोग्राफी केंद्राची, रुग्णालयांची तपासणी करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या आहेत.

यापुढे ज्या-ज्या ठिकाणी बालविवाह लावले जातील. त्या मंदिरांसह इतर धार्मिक स्थळांच्या विश्वस्त समित्या बरखास्त करून संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत.

हुंड्यासाठी विवाहितांचा गळा दाबून खून केला जातो, तरीही मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याऐवजी आपण तिच्या हुंड्याची तजवीज करतो, ही मोठी शोकांतिका आहे. हे रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रबोधनाची गरज आहे. जिल्ह्यात कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे मोठ्या प्रमाणात आहेत. मागील वर्षभरात १०९ बालविवाह रोखण्यात आले असले तरी लपून-छपून होणाऱ्या बालविवाहांचे प्रमाण मोठे असू शकते, असे त्या म्हणाल्या. बालविवाह रोखण्यासाठी समाजजागृतीही गरजेची आहे. खोटे जन्मदाखले देणाऱ्या ग्रामसेवकांवरही कारवाई केली जाईल. जिल्ह्यात शरीरविक्रय करणाऱ्या महिला व अल्पसंख्यांक महिलांसाठी स्वतंत्रपणे समुदेशन बैठक घेवून त्यांच्यासाठी निरनिराळ्या योजना राबविल्या जातील, असे चाकणकर यांनी यावेळी सांगितले. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना, ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने माहिती व आढावा घेवून येत्या आठ दिवसांत योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत निवारण तक्रार समिती आवश्यक-श्रीमती रुपाली चाकणकर

## जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागप्रमुखांची आढावा बैठक



**परभणी** - कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत निवारण तक्रार समिती असणे आवश्यक आहे. सर्व आस्थापनांची तपासणी करण्यात येऊन प्रत्येक ठिकाणी ही समिती स्थापन झाली आहे का, याची खातरजमा करण्याचे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर यांनी केले. आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभागप्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली.

राज्य महिला आयोगाच्या सदस्या संगीता चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती रागसुधा आर., प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, मनपा आयुक्त श्रीमती तृप्ती सांडभोर, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कैलास तिडके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रावजी सोनवणे, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आर. जी. रोडगे, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत खंदारे, जिल्हा कारागृह अधीक्षक गो. के. राठोड, सहायक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे आदींसह विविध विभागांचे अधिकारी आदींसह संरक्षण अधिकारी, पॅनलचे सदस्य, तक्रारदार महिला व नातेवाईक आदींसह विभागप्रमुख उपस्थित होते.

तसेच महिलांनी केलेल्या तक्रारींवर या समितीमार्फत तातडीने कार्यवाही होईल, यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. अवैध गर्भपात रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करताना खाजगी रुग्णालयांना अचानक भेट देऊन तपासणी करावी. येत्या पंधरा दिवसांत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्यात यावा. बालविवाहाच्या तक्रारी, ऊसतोड कामगार महिलांची प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

मिशन वात्सल्य योजना, मनोधैर्य योजना, माझी कन्या भाग्यश्री, गृह स्वाधार योजना, शुभमंगल सामूहिक किंवा नोंदणीकृत योजना, विशाखा समिती, महिलांसाठी शासकीय वसतीगृहे यासह जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा कामगार अधिकारी, पोलीस विभाग, महिला व बालकल्याण, महिला आर्थिक विकास महामंडळ, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाशी संबंधित महिलांच्या योजना व उपक्रमांचा सविस्तर आढावाही श्रीमती चाकणकर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांकडून घेतला.

सकाळ

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे निर्देश

# ...तर इतर विश्वस्त समित्या बरखास्त करा

सकाळ वृत्तसेवा

परभणी, ता. ३ : यापुढे ज्या-ज्या ठिकाणी बालविवाह लावले जातील त्या मंदिरांसह इतर धार्मिक स्थळांच्या विश्वस्त समित्या बरखास्त करून संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी शुक्रवारी (ता. तीन) दिले.

शुक्रवारी 'आयोग आपल्या दारी' अभियानांतर्गत जनसुनावणी घेतल्यानंतर चाकणकर या पत्रकारांशी बोलत होत्या. राज्य महिला आयोगाच्या सदस्य ॲड. संगीता चव्हाण, प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, पोलिस अधीक्षक रागसुधा आर., निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कैलास तिडके, भावना नखाते आदींची उपस्थिती होती.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या, प्रत्येक विभाग, जिल्हानिहाय जनसुनावणी घेतली जात आहे, त्या-त्या ठिकाणी वेगवेगळ्या समस्या आहेत. परभणीतील जनसुनावणीत ९५ पेक्षा अधिक तक्रारी ऐकून घेत त्यांचे निराकरण करण्यात आले. काही तक्रारींवर जिल्हा प्रशासनाला योग्य त्या सूचना करण्यात आल्या आहेत. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, गर्भपाताच्या वेळी झालेल्या मृत्यू प्रकरणातील तपासकामात दिरंगाई, महिलांशी असभ्य वर्तन आणि महिला, मुलींवरील अत्याचाराच्या अनुषंगाने काही तक्रारी दाखल झाल्या आहेत. आर्थिक व्यवहाराशी निगडित केवळ एकच तक्रार दाखल झाली आहे. गर्भपात, अवैध गर्भलिंग निदान चाचणी हे मुद्देदेखील समोर आले आहेत. या सर्व तक्रारी आणि समस्यांच्या अनुषंगाने येत्या १५ दिवसांत ही प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. परभणी जिल्ह्यात कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे मोठ्या प्रमाणात आहेत. मागील वर्षभरात १०९ बालविवाह रोखण्यात आले असले तरी

लपून-छपून होणाऱ्या बालविवाहांचे प्रमाणही मोठे असू शकते, असे त्या म्हणाल्या. बालविवाह रोखण्यासाठी समाजजागृतीही गरजेची असून खोटे जन्मदाखले देणाऱ्या ग्रामसेवकांवरही कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिली.



परभणी : जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत संवाद साधताना रूपाली चाकणकर सोबत रागसुधा आर. डॉ. प्रताप काळे व इतर.

Nanded, Parbhani-Today1
04/03/2023 Page No. 4